INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 1 | FEBRUARY - 2023

# नागपूर जिल्ह्यातील स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांच्या आर्थिक व स्वयंरोजगार विषयक समस्या— एक विश्लेषणात्मक अध्ययन (कालखंड २०११ ते २०२०)

प्रा. नामदेव चि. मोरे[१] , डॉ. अरुण नत्थुजी दसोड[२]
[१]संशोधनकर्ता
[२] मार्गदर्शक, शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पांढरकवडा, ता. केळापूर, जि. यवतमाळ.

## साराशं

प्रस्तुत प्रकरणात नागपूर जिल्ह्यातील ५०० महिला व्यवसायिकांकडून संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान संबंध तपासण्याकरीता काई वर्ग परिक्षण या सांख्यिकीय चाचण्यांचा वापर करण्यात आला विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले. संकलित केलेली माहिती विभागवार वर्गीकृत करण्यात आली.



## प्रस्तावना

कोणतेही कार्यक्षेत्र हे समस्याहीन नसते. समस्या सर्वत्रच असतात. फक्त त्याची तीव्रता, वारंवारता आणि प्रकार, मुळ कारण वेगवेगळे असते. स्वयंरोजगार करतांना वेगवेगळी संपर्क क्षेत्र, व्यक्ती, भाषा, कामाचे स्वरूप, स्त्रीच्या मर्यादा, कुटुंबाची अधिक जबाबदारी इत्यादीमुळे स्वयंरोजगारात पुरूष जेवढा समर्पित असतो. तेवढी स्त्री राहत नाही. संस्कार, प्रेरणा, मार्गदर्शन इत्यादींचा अभाव ही कारणे बरेचदा स्वयंरोजगार करतांना समस्या निर्माण होण्यास कारणीभूत ठरतात. स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन, तिच्या व्यवसायिक प्रवृत्तीला असणाऱ्या मर्यादा, घराबद्दल स्त्रीला असणारा समर्पण भाव, घरगुती कामाची अधिक जबाबदारी, वेळी—अवेळी करावी लागणारी कामे, इतरांच्या असणारा दृष्टीकोन तिच्या व्यवसायिक विकासाला मारक ठरतो. अपेक्षा आणि योग्यता यातील अंतर, स्त्रीचा स्वत:चा व कुटुंबियांचा व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टीकोन, स्वयंरोजगाराच्या संपर्क केंद्राविषयीची अपुरी माहिती, आर्थिक ताण—तणाव, घरगुती भांडवलाची अनुपलब्धता, व्यवसयसाठी लागणारा वेळ, जागा, कामाच्या चुकीच्या वेळा, अपुरे उत्पन्न, वसुलीत त्रास, सामग्रीची अनुपलब्धता, अयोग्य वातावरण, अपुरा वेळा, अपुरे सहकार्य, असुरक्षितता, आत्मविश्वासाचा अभाव, संवाद कौशल्याचा अभाव, बाजारपेठेचे अज्ञान, योग्य निर्णय घेण्याची अपुरी क्षमता, अनुभवहिनता, बाहेरील क्षेत्रातील संपर्काचा अभाव, हिशोबविषयक अज्ञान, अपुरे व अयोग्य मार्गदर्शन, शारिरीक थकण्याचे वाढते प्रमाण, मागणी व नफयाविषयी अयोग्य लक्ष्य निर्धारण, एकूणच आर्थिक क्षेत्राविषयी अपुऱ्या माहितीमुळे बऱ्याच समस्या उद्‌भवतात.नाविण्यतेचा अभाव, व्यवस्थापन कौशल्याचा अभाव, इ. विभिन्न व्यवसायाशी संबंधीत समस्या ही विभिन्न असतात. प्रत्येक क्षेत्रात कार्याचे स्वरूप, कौशल्याची मागणी वेगळी असते. त्यामुळे वेगवेगळ्य व्यवसायानुसार समस्याही वेगवेगळया असतात.

अशा प्रकारे स्त्रीचा स्वयंरोजगार ही एक उज्वल आर्थिक भविष्याची वाटचाल ठरावी यासाठी व्यावसायिक निवड, निर्माण होणाऱ्या समस्या व आर्थिक समस्या ह्यांचे चिकित्सक अध्ययन करण्याच्या दृष्टीने ''नागपूर जिल्ह्यातील स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांच्या आर्थिक व स्वयंरोजगार विषयक समस्या— एक विश्लेषणात्मक अध्ययन (कालखंड २०११ ते २०२०) या विषयाची निवड करण्यात आली.

**सारणी क्रमांक १: महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना आर्थिक असुरक्षितता जाणविण्यासंबंधी माहिती**

| **व्यवसाय करतांना आर्थिक असुरक्षितता जाणवणे** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ४६४ | ९२.८ |
| नाही | ३६ | ७.२ |
| **एकूण** | **५००** | **१००** |
| Chi -square | DF | P-value |
| 366.368 | 1 | <0.05 |

Chi Square – काई वर्ग मूल्य; DF- (Degrees of Freedom) स्वतंत्र्यांश; P-value- P मूल्य सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना आर्थिक असुरक्षितता जाणविण्यासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९२.८ टक्के महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना आर्थिक असुरक्षितता जाणवत असून ७.२ टक्के महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना आर्थिक असुरक्षितता जाणवत नाही. व्यवसायिकांद्वारे करण्यात येत असलेल्या व्यवसायात आर्थिक असुरक्षितता जाणविण्यानुसार महिला व्यावसायीकांची तुलना नॉन–पॅरामेट्रीक काई वर्ग परिक्षणाच्या मदतीने केली असता महिला व्यावसायिकांदरम्यान सार्थक (काई वर्ग – ३६६.३६८; स्वातंत्र्यांश– १; P <०.०५) फरक आहे. म्हणजेच महत्वपूर्णपणे अधिक महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना आर्थिक असुरक्षितता जाणवते.

**सारणी क्रमांक २: महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना येणाऱ्या आर्थिक समस्यांच्या प्रकारासंबंधी माहिती**

| **आर्थिक समस्यांचा प्रकार** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| कर्जाची परतफेड | २५६ | ५५.४ |
| व्यवसायात अपुरा नफा | ३६६ | ७९.२ |
| व्यवसायात स्पर्धकांची वाढ | १५० | ३२.५ |
| वाढती महागाई | ४४३ | ९५.९ |
| इतर | ९५ | २०.६ |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना येणाऱ्या आर्थिक समस्यांच्या प्रकारासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ७९.२ टक्के महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना व्यवसायात नफा अपूरा मिळत असून ५५.४ टक्के महिला व्यवसायिकांना व्यवसायात कर्जाची परतफेड करतांना आर्थिक समस्या जाणवतात. तसेच वाढती माहागाई ही आर्थिक समस्या जाणवणाऱ्या महिला व्यावसायिकांची टक्केवारी ९५.९ टक्के असून व्यवसायात स्पर्धकांची वाढ व इतर आर्थिक समस्या जाणवणाऱ्या महिला व्यावसायिकांची टक्केवारी अनुक्रमे ३२.५ टक्के व २०.६ टक्के आहे. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना एकापेक्षा अधिक आर्थिक समस्या जाणवत असून बहुतांश महिला व्यावसायिकांना वाढती माहागाई व व्यवसायात स्पर्धकांची वाढ या आर्थिक समस्या जाणवतात.

**सारणी क्रमांक ३: महिला व्यवसायिकांना व्यवसायात आर्थिक अनिश्चितता जाणवण्यासंबंधी माहिती**

| **व्यवसायात आर्थिक अनिश्चितता** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ४५१ | ९०.२ |
| नही | ४९ | ९.८ |
| **एकूण** | **५००** | **१००** |
| Chi -square | DF | P-value |
| 323.208 | 1 | <0.05 |

Chi Square – काई वर्ग मूल्य; DF- (Degrees of Freedom) स्वतंत्र्यांश; P-value- P मूल्य सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये महिला व्यवसायिकांना व्यवसायात आर्थिक अनिश्चितता जाणवण्यासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९०.२ टक्के महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना आर्थिक अनिश्चितता जाणवत असून ९.८ टक्के महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना आर्थिक अनिश्चितता जाणवत नाही. व्यवसायिकांद्वारे करण्यात येत असलेल्या व्यवसायात आर्थिक अनिश्चितता जाणविण्यानुसार महिला व्यावसायीकांची तुलना नॉन–पॅरामेट्रीक काई वर्ग परिक्षणाच्या मदतीने केली असता महिला व्यवसायिकांदरम्यान सार्थक (काई वर्ग – ३२३.२०८; स्वातंत्र्यांश– १; P <०.०५) फरक आहे. म्हणजेच महत्वपूर्णपणे अधिक महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना आर्थिक अनिश्चितता जाणवते.

**सारणी क्रमांक ४: महिला व्यवसायिकांना व्यवसायात येणाऱ्या आर्थिक अनिश्चिततेच्या कारणांसंबंधी माहिती**

| व्यवसायात आर्थिक अनिश्चिततेची कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| लागणारा खर्च | ४३५ | ९६.५ |
| व्यवसायातून होणारे उत्पन्न | ३४६ | ७६.७ |
| ग्राहकांची अनुपलब्धता | ४२६ | ९४.५ |
| इतर | २१८ | ४८.३ |

उपरोक्त सारणी क्रमांक ४ मध्ये महिला व्यवसायिकांना व्यवसायात येणाऱ्या आर्थिक अनिश्चिततेच्या कारणांसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९५.५ टक्के महिला व्यवसायिकांच्या आर्थिक अनिश्चततेचे कारण व्यवसायात लागणारा खर्च असून ९४.५ टक्के महिला व्यवसायिकांच्या आर्थिक अनिश्चततेचे कारण ग्राहकांची अनुपलब्धता हे आहे. तसेच व्यवसायातून होणारे आर्थिक उत्पन्न व इतर बाबी या आर्थिक अनिश्चिततेचे कारण आहे हे नमूद करणाऱ्या महिला व्यावसायिकांची टक्केवारी क्रमशः ७६.७ टक्के व ४८.३ टक्के आहे. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, महिला व्यवसायिकांच्या आर्थिक अनिश्चततेचे एकापेक्षा अधिक कारण असून बहुतांश महिला व्यावसायिकांना व्यवसायात लागणारा खर्च, ग्राहकांची अनुपलब्धता तसेच व्यवसायातून होणारे आर्थिक उत्पन्न ही आर्थिक अनिश्चिततेची कारणे वाटतात.

## निष्कर्ष

सारणी क्रमांक १ मधिल माहितीनूसार महत्वपूर्णपणे (९२.८ टक्के; काई वर्ग – ३६६.३६८; स्वातंत्र्यांश– १; P <0.०५) अधिक महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना आर्थिक असुरक्षितता जाणवते. सारणी क्रमांक २ मधिल माहितीनूसार महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना एकापेक्षा अधिक आर्थिक समस्या जाणवत असून बहुतांश महिला व्यावसायिकांना वाढती माहागाई (९५.९ टक्के) व व्यवसायात स्पर्धकांची वाढ (७९. टक्के) या आर्थिक समस्या जाणवतात. सारणी क्रमांक ३ मधिल परीणाम दर्शवतात की महत्वपूर्णपणे (९०.२ टक्के; काई वर्ग – ३६६.३६८; स्वातंत्र्यांश– १; P <0.०५) अधिक महिला व्यवसायिकांना व्यवसाय करतांना आर्थिक अनिश्चितता जाणवते. सारणी क्रमांक ४ प्रमाणे महिला व्यवसायिकांच्या आर्थिक अनिश्चततेचे एकापेक्षा अधिक कारण असून बहुतांश महिला व्यावसायिकांना व्यवसायात लागणारा खर्च (९६.५ टक्के), ग्राहकांची अनुपलब्धता (९४.५ टक्के) तसेच व्यवसायातून होणारे आर्थिक उत्पन्न (७६.७ टक्के) ही आर्थिक अनिश्चिततेची कारणे वाटतात.

## संदर्भसूची

१) डॉ. आगलावे प्रदीप संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपूर १ जाने.२०००
२) डॉ.भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथनिर्मीत मंडळ, नागपुर. तृतीय आवृत्ती १९८७
३) डॉ.संत दु.का. संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती जुलै – १९८८
४) डॉ.नाडगोंडे गुरूनाथ सामाजिक संशोधन पद्धती फडके प्रकाशन कोल्हापूर द्वितीय आवृत्ती ऑक्टो.१९९९
५) डॉ. जरारे विजय एल. समाजिक शास्त्रीय संशोधन प्रणाली अद्वैत प्रकाशन, अकोला २२ ऑक्टो.२००४
६) प्रा. घाटोळे रा.ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती मंगेश प्रकाशन, नागपूर पाचवी आवृत्ती १९९२
७) डॉ. बोरूडे रा. र. संशोधन पद्धतीशास्त्र पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन सप्टें.२००५
८) कऱ्हाडे बि. एम. ''भारतीय समाज प्रश्न आणि समस्या' पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स महाल, नागपूर पृ. क्र. १३६